RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ४२]          बुधवार, मार्च २५, २०२६/चैत्र ४, शके १९४८          [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १४१**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ मार्च, २०२६.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२५/प्र.क्र.२५७/मुद्रांक-२.—महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, याद्वारे, महाराष्ट्र राज्यामध्ये स्थित असलेल्या शत्रू मालमत्तांशी संबंधित असणाऱ्या भारताच्या शत्रू मालमत्तेच्या अभिरक्षकाने (सीईपीआय) दिलेल्या विक्री प्रमाणपत्रावर उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेद १६ अन्वये अन्यथा आकारण्यायोग्य असलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क, पुढील शर्तीस अधीन राहून, माफ करीत आहे :—

**शर्ती.—**

(१) ही सूट, शत्रू मालमत्ता अधिनियम, १९६८ (१९६८ चा ३४) अन्वये भारताच्या शत्रू मालमत्तेच्या अभिरक्षकाने (सीईपीआय) दिलेल्या विक्री प्रमाणपत्राच्या पहिल्या संलेखासाठीच केवळ लागू असेल.

(२) या आदेशान्वये मुद्रांक लाभ मिळणारा खरेदीदार, त्याच संव्यवहारासाठी शासनाच्या इतर कोणत्याही आदेशान्वये, योजनेनुसार किंवा धोरणानुसार मुद्रांक शुल्कातील अन्य कोणत्याही सवलतीसाठी किंवा माफीसाठी हक्कदार असणार नाही.

(३) जेव्हा हा आदेश, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या तारखेपूर्वी आधीच मुद्रांक शुल्क प्रदान करण्यात आलेले असेल त्या बाबतीत, कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

(४) भारताच्या शत्रू मालमत्तेच्या अभिरक्षकाने (सीईपीआय), दिलेल्या विक्री प्रमाणपत्राच्या या संलेखानंतर, मालमत्तेच्या पुढील कोणत्याही हस्तांतरास ही सूट लागू असणार नाही.

(५) ज्याला इतर कोणत्याही शासकीय आदेशानुसार किंवा धोरणानुसार याच मालमत्तेकरिता मुद्रांक शुल्कातील सूट मिळालेली आहे अशी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था, या आदेशान्वये सूट मिळण्यासाठी पात्र असणार नाही.

**स्पष्टीकरण.—**

या आदेशाच्या प्रयोजनार्थ, "विक्री प्रमाणपत्र" याचा अर्थ, शत्रू मालमत्ता अधिनियम, १९६८ (१९६८ चा ३४) अन्वये अधिसूचित शत्रू मालमत्तेच्या विल्हेवाटीस पुष्टी देणाऱ्या भारताच्या शत्रू मालमत्तेच्या अभिरक्षकाने (सीईपीआय) दिलेले प्रमाणपत्र, असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 25th March 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STAMP ACT.

No.Mudrank-2025/C.R.No.257/Mudrank-2- In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary so to do in the public interest, hereby remits the stamp duty in whole Certificate of Sale issued by the Custodian of Enemy Property for India (CEPI), otherwise chargeable under Article 16 of Schedule-1 appended to the said Act on the pertaining to enemy properties situated within the State of Maharashtra, subject to the following conditions, namely :—

**Conditions :—**

(1) This remission shall apply only to first instrument of Certificate of Sale issued by CEPI under the Enemy Property Act, 1968 (34 of 1968).

(2) The purchaser availing benefit under this order shall not be entitled to any other concession or remission of stamp duty under any Government Order, Scheme or Policy for the same transaction.

(3) No refund shall be granted where stamp duty has already been paid prior to the publication of this Order in the *Maharashtra Government Gazette*.

(4) This remission shall not apply to any subsequent transfer of the property after this instrument of Certificate of Sale issued by CEPI.

(5) Any person or entity who has availed stamp duty remission under any other Government order or policy for the same property shall not be eligible for remission under this order.

**Explanation.—**

For the purpose of this order, "Certificate of Sale" means the certificate issued by CEPI confirming disposal of notified enemy property under the Enemy Property Act, 1968 (34 of 1968).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.